महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.१९९/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २० फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना -

मातोश्री शिक्षण संस्था राक्षेवाडी, गुरुराजनगर, ता.खेड, जि. पुणे संचलित एस.एन. इंग्लिश मिडीयम स्कुल, राक्षेवाडी, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत मातोश्री शिक्षण संस्था राक्षेवाडी, गुरुराजनगर, ता.खेड, जि. पुणे संचलित एस.एन. इंग्लिश मिडीयम स्कुल, राक्षेवाडी, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे या शाळेस (उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इयत्ता ६ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती

(१) सदर संस्थेने अद्ययावत आरटीई नमुना-२ प्रमाणपत्र, बँक बॅलन्स प्रमाणपत्र व तसेच लगतच्या तीन वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे ३ महीन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून